

# अकादमी अनुवाद पुरस्कार जाहीर

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

साहित्य अकादमीचा सन २०२४चा मराठीसाठी अनुवाद पुरस्कार सुदर्शन आठवले यांना शुक्रवारी जाहीर करण्यात आला. कोकणीसाठी मिलिंद म्हामल यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. ताम्रपत्र, शाल आणि ५०,००० रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अनुवाद पुरस्कारांचे वितरण यावर्षी होणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात केले जाईल.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अकादमीच्या कार्यकारी मंडळाने या अनुवाद पुरस्कारांसाठी २१ भाषांतील विजेत्यांच्या नावांना मान्यता दिली. प्रथेप्रमाणे साहित्य अकादमीच्या वार्षिक






साहित्योत्सवाच्या पहिल्या दिवशी ही बैठक पार पडली. नेपाळी आणि संस्कृत भाषांमधील अनुवाद पुरस्कार नंतर जाहीर केले जाणार आहेत. आठवले यांना गुरचरण दास यांच्या, 'द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' (टीका) या इंग्रजी पुस्तकाच्या अनुवादासाठी, तर म्हामल यांना एम. हिरियाना यांच्या 'आउटलाइन ऑफ इंडियन फिलोसॉफी' (दर्शन) या इंग्रजी पुस्तकाच्या अनुवादासाठी पुरस्कार जाहीर झाला.

हिंदीसाठी मदन सोनी यांना यशोधरा दालमिया यांच्या 'सय्यद हैदर रज़ा : जर्नी ऑफ अॅन अनपॅरलेल्ड आर्टिस्ट' या पुस्तकासाठी, तर इंग्रजीसाठी अनीस-उर-रहमान यांना 'हजारों ख्वाहिशें ऐसी' (द वंडरफुल वर्ल्ड ऑफ उर्दू ग़ज़ल्स) या पुस्तकाच्या अनुवादासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.